# शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
विद्यानगर, कोल्हापूर ४१६००४
फोन – (०२३१) २५२१०३८, फॅक्स २५२१०१६
E-mail : gpkolhapur@yahoo.com


जा.क्रं.शातंनिको/विवि/२०२०-२१/डीबीटीपोर्टल/मुदतवाढ/प्रलंबित/१९-२०,२०-२१/ 2902 दि- 2 8 SEP 20

अत्यंत महत्वाचे/तातडीचे. आकरावी अंतिम सुचना.

**प रि प त्र क -**

**विषय – महाडीबीटी पोर्टलवरील सन २०१९-२० व २०२०-२०२१ या वर्षातील अनु.जाती प्रवर्गातील प्रलंबित असलेल्या अर्जा बावत..**

संदर्भ – १) या कार्यालयाचे परिपत्रक क्रं २७१७. दि ०३/०९/२०२१ पहावे.
२) मा.सहाय्यक आयुक्त सो, समाजकल्याण ,कोल्हापूर यांचे पत्र जाक्रं.सआसकको/ भासशि/डीबीटीं /२०२१-२२/३५४४. दि १८/०९/२०२१.

वरील विषयास अनुसरुन संदर्भ क्रं १ नुसार संस्थेतील सर्व शाखामधील सर्व प्रवर्गाच्या (EBC/SEBC/EWS. तसेच OBC. ST.SC.VJNT. VJ . SBC. MINORITY ) विद्यार्थ्यांकरीता महाडीबीटी प्रणालीमधील अर्ज भरण्याकरीता दि ३०/०९/२०२१ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे. **तसेच शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मधील सर्व प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज पुनःश्च अर्ज (Re-Apply) होत नव्हते अशा विद्यार्थ्यांकरीता एक अंतिम संधी म्हणून दि १५/०९/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.**

तसेच ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज रिव्हर्ट केलेले **(Sent Back)** आहेत, त्यांनीही वरीलप्रमाणे **अंतिम दि ३०/०९/२०२१** पर्यंत अर्जातील कागदपत्रांची पुर्तता त्वरीत करुन अर्ज पुन्हा महाडीबीटी प्रणालीव्दारे मंजुरीकरीता पाठविण्यात यावेत, तसेच शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मधील विद्यार्थ्यांनीही सदरचे अर्ज स्वताच्या लॉगीनमध्ये प्रलंबित न ठेवता त्रुटींची पूर्तता करुन अर्ज त्वरीत महाडीबीटी प्रणालीव्दारे पाठविणेत यावेत, **अन्यथा भविष्यात उदभवणा-या अडचणीस सर्वस्वी संबंधित विद्यार्थी जबावदार राहतील व रु ३०००/- किंवा रु ६०००/- शिक्षण शुल्क भरण्याची सर्वस्वी जबावदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील** याची नोंद घ्यावी.

**तसेच ज्या विद्यार्थ्यांचे स्वतःचे बॅंक खाते आधार कार्डशी लिंक नाही अशा विद्यार्थ्यांनी त्वरीत आधार कार्ड स्वतः च्या बॅंक खात्याशी एनपीसीआय मॅपर मधून लिंक करावे अन्यथा शिष्यवत्तीची रक्कम त्यांचे खात्यावर जमा होणार नाही . तरी सर्व संबंधित प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी अधार कार्ड स्वता च्या बॅंक खात्याशी लिंक करावे.**

सर्व प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांनी त्रुटी पाहण्याकरीता सुचना खालील प्रमाणे ...

**My Applied Scheme Application ID**

वर क्लिक करुन मेसेज बॉक्स मध्ये शेवटी ज्या त्रुटी दिलेल्या आहेत त्या दुरुस्त करुन फॉर्म पुन्हा Reapply करावा . Server Down असल्याने लगेच त्रुटी दिसत नाहीत तरी ४-५ वेळा प्रयत्न केल्यावर त्रुटी दिसतात.

**तसेच विद्यार्थ्यांनी केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र शासनाच्या योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा** लाभ घेणेचा आहे याची नोंद घ्यावी.

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन ,कोल्हापूर.

प्रत- मुख्य सूचना फलकावर विद्यार्थ्यांचे माहितीसाठी व पूढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
प्रत- श्री. इंगळे, प्रोग्रॅमर यांना संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी.